# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक १४/०३/२०१२ व दिनांक १९/६/२०१२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. उत्तम मोकळे

अनुमोदकाचे नांव : श्री. कुलदिपसिंग मथारू

**परिवहन समिती ठराव क्र. :– १** **दिनांक:– ४/२/२०१३**

ही परिवहन समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक १४/०३/२०१२ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४ पर्यंतचे व दिनांक १९/६/२०१२ पृष्ठ क्र. १ ते ६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**एकमताने**

सभापती / पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**विषय क्र. २ :–** परिवहन उपक्रमाचे सन २०१२–१३ चे सुधारीत व २०१३–२०१४ चे मूळ अंदाजपत्रक तयार करणे.

**प्रस्तावना**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८ च्या तरतुदीप्रमाणे परिवहन व्यवस्थापकाचे अंदाज विचारात घेऊन “ब” अर्थसंकल्पीय अंदाज परिवहन समितीने तयार करावयाचे आहेत.सदर अंदाजीत परिवहन उपक्रमाचे संपादन, त्याचा विस्तार, त्याचे प्रशासन चालविणे व त्याची व्यवस्था यामुळे महानगरपालिका ज्याबद्दल या अधिनियमान्वये दायी असेल अशा सर्व रक्कमा आणि मुद्दल व व्याज यांचे हप्ते जसजसे देय होतील तसतसे ते भरण्याबाबत तरतुद केली पाहिजे.महानगरपालिकेने परिवहन उपक्रम खाजगी सहभागाने राबविण्याचे योजले असून अधिनियमातील तरतुदीनुसार वित्तिय वर्ष २०१२–२०१३ चे उत्पन्न व खर्चाचे सुधारीत अंदाज पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| | | |
|---|---|---|
| “ब” अंदाजपत्रकिय उत्पन्न | : | ६६२ |
| “ब” अंदाजपत्रकिय खर्च | — | |
| १) परिवहन सेवा खर्च | : | — |
| २) सभासदांना मानधन,सभा व इतर भत्ते | : | २०३ |
| | | ............ |
| एकुण | | २०३ |

वर्ष २०१२–२०१३ करिता उत्पन्न खर्चाचे अंदाज लक्षात घेता रहाणारी तुट “अ” अंदाजपत्रकातुन वर्ग करण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

आर्थिक वर्ष २०१३–२०१४ साठी तयार करण्यात आलेला उत्पन्न व खर्चाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

(आकडे हजारात)

| | | |
|---|---|---|
| “ब” अंदाजपत्रकिय उत्पन्न | : | ६६२ |
| “ब” अंदाजपत्रकिय खर्च | : | |
| १) परिवहन सेवा खर्च | : | ५०० |
| २) सभासदांना मानधन,सभा व इतर भत्ते | : | ५७८ |
| | | ............ |
| एकुण | | १०७८ |

वर्ष २०१३–२०१४ करिता उत्पन्न खर्चाचे अंदाज लक्षात घेता रहाणारी तुट “अ” अंदाजपत्रकातुन वर्ग करण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८ च्या तरतुदीप्रमाणे उत्पन्न व खर्चाचे परिवहन उपक्रमासमोर सादर करण्यात येत आहे.

परिवहन समिति ठराव क्रं.. २ दिनांक ४/२/२०१३

सूचकाचे नाव : श्री. परमानंद हिंदुजा

अनुमोदकाचे नाव : श्री. भरत खरे

ही परिवहन समिति मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८ मधील सर्व तरतुदीस अधीन राहुन वर्ष २०११—२०१२ चे सुधारीत व वर्ष २०१३—२०१४ व परिवहन व्यवस्थापकांचे अदांज विचारात घेवुन परिवहन उपक्रमाचे पुढील प्रमाणे अदांजपत्रक मंजुर करीत आहे.

**वर्ष २०१२—२०१३ चे सुधारीत अंदाजपत्रक**

(आकडे हजारात)

| | |
|---|---|
| “ब” अंदाजपत्रकिय उत्पन्न : | ६६२ |
| “ब” अंदाजपत्रकिय खर्च — | ५०० |
| १) परिवहन सेवा खर्च : | — |
| २) सभासदांना मानधन,सभा व इतर भत्ते : | ५०० |

**वर्ष २०१३—२०१४ चे मुळ अंदाजपत्रक**

(आकडे हजारात)

| | |
|---|---|
| “ब” अंदाजपत्रकिय उत्पन्न : | ६६२ |
| “ब” अंदाजपत्रकिय खर्च : | |
| १) परिवहन सेवा खर्च : | १००० |
| २) सभासदांना मानधन,सभा व इतर भत्ते : | ५७८ |

उत्पन्न सव खर्चाचे अंदाज लक्षात घेता राहणारी तुट ‘‘अ’’ अंदाजपत्रकातुन वर्ग करण्यास मंजुरी देत आहे. या ठरावांतर्गत निर्णय अंतिम असुन तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात येत आहे.

सूचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

**विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक ०४/०२/२०१३ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. होमनारायण वर्मा

अनुमोदकाचे नांव : श्री. भरत खरे

<u>परिवहन समिती ठराव क्र. :—</u> २ अ    <u>दिनांकः— २०/५/२०१३</u>

ही परिवहन समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक ४/२/२०१३ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ७ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>एकमताने</u>

सभापती / पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

विषय क्र.२:— परिवहन उपक्रमाच्या टिकीट दरात वाढ करण्यास मान्यता देणे

## प्रस्तावना

संदर्भ में.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि, उल्हासनगर यांचे पत्र क्रं.बीटी/३०५/०३/१३दिनांक १४/०३/२०१३

. उपरोक्त संदर्भित पत्रान्वये में.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि, डिझेलच्या दरात, चालक व वाहक व अन्य परिवहनच्या कर्मचा—यांच्या पगारात वाढ झाली असल्यामुळे तसेच मेंटेनन्स, स्पेअर पार्टस ऑइल इत्यादी गोष्टीमध्ये वाढ झाली असल्यामुळे सध्याच्या टिकीट दरात परिवहन सेवा सुरू ठेवणे कठीण होत आहे.व सोबत जोडलेल्या टिकीट दरानुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमातील टिकीट दरात वाढ करून मिळण्याची विनंती केलेली आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या बी.ओ.ओ.टी तत्वावरिल परिवहन सेवा ही माहे जानेवारी २०१० अखेर सुरू करण्यात आलेली होती.तेव्हा डिझेलच्या दर रू.३७.४८ एवढा होता.व सुरूवातीचे टिकीट दर रू. ३ एवढे होते.तद्नंतर माहे सप्टेबर २०११ मध्ये डिझेलच्या दरात वाढ होऊन रू. ४६.२० एवढा झाल्यामुळे ठेकेदाराने टिकीट दरात वाढ करण्यास विनंती केली होती. व सदर ठेकेदाराची मागणी रास्त असल्यामुळे विभागाने वाढीव टिकीट दराच्या प्रस्तावास मा. महासभा, मा. परिवहन समिती व एम.एम.आर.टी.ए समितीची मान्यता घेवून माहे सप्टेबर २०१२ मध्ये टिकीट दरात वाढ करण्यात आली होती.परंतु त्यावेळेस डिझेलच्या दरात वाढ होऊन रू. ५३.६१ एवढे दर झाल्यामुळे ठेकेदाराला फारसा फायदा झाला नाही.

आता उपरोक्त संदर्भित पत्रान्वये ठेकेदाराने टिकीट दरात वाढ करून मिळण्यासबाबत कळविले आहे.सध्या सुरू असलेल्या टिकीटच्या दरा नंतर आता पुन्हा डिझेलच्या दरात कमीत कमी १० रूपयांनी वाढ झाली आहे.सध्याचे डिझेलचे दर रू. ५५.४७ एवढे असून उल्हासनगर महानगरपालिकेची परिवहन सेवा सुरळीत सुरू ठेवण्यासाठी टिकीट दरात वाढ करून देणे योग्य वाटते.सध्या सुरू असलेले टिकीट दर व ठेकेदाराने मागणी केलेले नविन दर खालील तक्त्यात सादर.

<u>तुलनात्मक तक्ता</u>

| टप्पा क्रं | अंतर कि.मी. | सध्याचे टिकीट दर | में.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर यांनी मागणी केलेले नविन दर |
|---|---|---|---|
| | | रूपये | रूपये |
| १ | ० — २ | ५.०० | ७.०० |
| २ | २ — ४ | ७.०० | ८.०० |
| ३ | ४ — ६ | ८.०० | ९.०० |
| ४ | ६ — ८ | १०.०० | ११.०० |
| ५ | ८ — १० | १२.०० | १३.०० |
| ६ | १० — १२ | १३.०० | १४.०० |
| ७ | १२ — १४ | १४.०० | १५.०० |
| ८ | १४ — १६ | १५.०० | १६.०० |
| ९ | १६ — १८ | १६.०० | १७.०० |
| १० | १८ — २० | १७.०० | १८.०० |
| ११ | २० — २२ | १८.०० | १९.०० |
| १२ | २२ — २४ | १९.०० | २०.०० |
| १३ | २४ — २६ | २०.०० | २१.०० |
| १४ | २६ — २८ | २२.०० | २३.०० |
| १५ | २८ — ३० | २३.०० | २४.०० |
| १६ | ३० — ३२ | २४.०० | २५.०० |
| १७ | ३२ — ३४ | २५.०० | २६.०० |
| १८ | ३४ — ३६ | २६.०० | २७.०० |
| १९ | ३६ — ३८ | २८.०० | २९.०० |
| २० | ३८ — ४० | ३०.०० | ३१.०० |

वरिल ठेकेदाराने मागणी केलेले दर योग्य असून मा. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, मुंबई महानगर क्षेत्र **(M.M.R.T.A)** समितीने नुकतीच कल्याण डोबिंवली महानगरपालिका परिवहन सेवेच्या टिकीट दरास खालील प्रमाणे मान्यता दिलेली आहे.

| टप्पा क्र | अंतर कि.मी. | कल्याण डोबिंवली महानगरपालिका चे दर |
|---|---|---|
| | | रूपये |
| १ | ० — २ | ७.०० |
| २ | २ — ४ | ९.०० |
| ३ | ४ — ६ | ११.०० |
| ४ | ६ — ८ | १३.०० |
| ५ | ८ — १० | १५.०० |
| ६ | १० — १२ | १७.०० |
| ७ | १२ — १४ | १८.०० |
| ८ | १४ — १६ | १९.०० |
| ९ | १६ — १८ | २०.०० |
| १० | १८ — २० | २१.०० |
| ११ | २० — २२ | २२.०० |
| १२ | २२ — २४ | २३.०० |
| १३ | २४ — २६ | २४.०० |
| १४ | २६ — २८ | २६.०० |
| १५ | २८ — ३० | २७.०० |
| १६ | ३० — ३२ | २८.०० |
| १७ | ३२ — ३४ | २९.०० |
| १८ | ३४ — ३६ | ३०.०० |
| १९ | ३६ — ३८ | ३१.०० |
| २० | ३८ — ४० | ३२.०० |

वरिल तुलनात्मक तक्त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाचे टिकीट दर में.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि, उल्हासनगर यांनी प्रस्तावित केलेले दर हे कल्याण डोबिंवली महानगरपालिकाच्या दरापेक्षा कमी आहे.या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन विभागामार्फत में. केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर, उल्हासनगर यांनी मागणी केलेले दर प्रस्तावित न करता कल्याण डोबिंवली महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे नुकतेच मंजुर झालेले दर मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.जेणे करून उल्हासनगर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेत काही सुधारणा करता येईल.व ठेकेदाराकडून वारंवार टिकीट दर वाढविण्याबाबत मागणी होणार नाही.

तसेच टिकीट दरात वाढ झाली नाही तर ठेकेदारास परिवहन सेवा सुरू ठेवणे शक्य होणार नाही.असेही ठेकेदाराने संदर्भित पत्रान्वये कळविले आहे.परिवहन सेवा सुरळीत सुरू ठेवण्याच्या दृष्टीने वरिल दरांचा गोषवारा मंजुरीस्तव मा. परिवहन समितीच्या पुढे सादर करण्यात येत आहे.आपली मंजुरी प्राप्त झाल्यावर सदर प्रस्ताव मा. महासभेच्या निर्णयास्तव सादर करण्यात येईलण

परिवहन समिती ठराव क्र. ३ दिनांक :— २०/५/२०१३

सूचकाचे नाव :—श्री. परमानंद हिंदुजा

अनुमोदकाचे नाव :—श्री. कुलदिपसिंग मथारु

ही परिवहन समिती प्रस्तावनेत नमुद केलेल्या कल्याण डोंबिवली महानगरपालिका परिवहन सेवेच्या तिकिट दराप्रमाणे महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या तिकिट दरात वाढ करण्यास मान्यता देत नाही.

सूचकाची सही /—

अनुमोदकाचे नाव/—

सर्वानुमते
सभापती/पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर</u>

**<u>विषय क्र. १ :—</u>** मागील सभेचे दिनांक २०/०५/२०१३ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. परमानंद हिंदुजा

अनुमोदकाचे नांव : श्री. कुलदिपसिंह मथारु

**<u>परिवहन समिती ठराव क्र. :—</u> ३ अ** **<u>दिनांक:—</u>**

<u>१७/६/२०१३</u>

ही परिवहन समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक २०/५/२०१३ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ७ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>एकमताने</u>**

सभापती / पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

**विषय क्र. २:—** परिवहन सेवेच्या उर्वरीत मार्गासाठी नविन निविदा मागविण्यास मान्यता देणे.

## प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेने बी.ओ.ओ.टी. तत्वावर पी.पी.पी.अंतर्गत परिवहन सेवा माहे जानेवारी,२०१० अखेर मे.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि,उल्हासनगर यांचेमार्फत सुरु करण्यात आलेली आहे.सदर परिवहन सेवेत निविदेच्या अटी व शर्तीनुसार १० बसेसने सुरूवात कायची होती.परंतु सदर ठेकेदाराने २ बसेसने सुरूवात केली होती.तद्नंतर माहे सप्टेबर २०१० मध्ये त्यांनी एकूण १० बसेसने सुरूवात केली. नोव्हेबर २०१० मध्ये एकूण १५ बसेस झाल्या व माहे जुलै २०११ मध्ये एकूण २५ बसेस मे.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि,उल्हासनगर यांचेमसर्फत सुरू करण्यात आल्या होत्या.

सदर २५ बसेस सुरू करण्यासाठी मे.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि,उल्हासनगर यांना वारंवार पत्र व्यवहार करावा लागला. मे.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि,उल्हासनगर यांनी माहे सप्टेबर २०११ पर्यंत उल्हासनगर महानगरपालिकेची रॉयल्टी नियमित भरलेली आहे.तसेच शासनास अदा करावयाचे बालपोषण अधिभार व प्रवासी कर मार्च २०११ पर्यंत नियमित भरण्यात आलेले आहे.परंतु माहे सप्टेबर २०११ पासून अदयापपर्यंत वारंवार कळवून देखिल ठेकेदाराने उल्हासनगर महानगरपालिकेची रॉयल्टी व शासनास अदा करावयाचे बालपोषण अधिभार व प्रवासी कर अदयापपर्यंत भरलेले नाहीत.तसेच वरिल संदर्भित पत्रान्वये बस वाढविण्याबाबत वारंवार कळवून देखिल बस वाढविण्यात आलेल्या नाहीत.या उलट सुरू असलेल्या २५ बसेस पैकी ब्रेक डाऊनमुळे १८ ते २० बसेस सुरू आहेत.तसेच मे.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि,उल्हासनगर यांनी त्यांच्या पत्रान्वये परिवहन सेवा दुस—या ठेकेदारास दिली तरी त्यांची काही हरकत राहणार नाही असे कळविले आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेने परिवहन सुरू केली असतांना एकूण १४ मार्गाना एमएमआरटीए समितीकडून मान्यता घेण्यात आली होती.तसेच खालील १२ मार्गांना एस.टी.महामंडळाने सुरू करण्यासाठी हस्तांतर केले होते.व सदर १२ मार्गामधील काही समांतर मार्ग एस.टी महामंडळाने हस्तांतर केलेले आहे.ठेकेदाराला वारंवार कळवून देखिल ठेकेदाराने बस वाढविण्यामध्ये असमर्थ दिसून येत आहे.तसेच शासनाची व महापालिकेची रॉयल्टी ही भरीत नाही.व अशा प्रकारे करारच्या अटी व शर्तीचे त्याच्याकडून पालन करण्यात आलेले नाही.

ठेकेदाराला बस वाढविणे बाबत व रॉयल्टीबाबत विचारणा केली असता त्यांना परिवहन सेवेत नुकसान होत आहे व त्यामुळे महापालिकेची रॉयल्टी व शासनास अदा करावयाचे कर भरता येत नाही.सदर करापासून सुट मिळण्यासाठी शासनाकडे पत्र पाठविण्यात यावे असे त्यांच्याकडून वारंवार मागणी होत आहे. सदर ठेकेदाराची बस वाढविण्याची असमर्थता पाहता व त्यांनी अटी व शर्तीचे पालन न केल्यामुळे उल्हासनगर महानगरपालिकेच्या नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने खालील मंजुर मार्गासाठी कराराच्या अट क्रं. ३२, ५८ नुसार नविन निविदा मागविणे योग्य वाटते.

| अ. क्र. | मार्ग क्रमांक | एमएमआरटीए समिती ने मंजुर केलेले मार्ग |
|---|---|---|
| १ | १ | कल्याण रेल्वे स्टेशन ते अंबरनाथ रेल्वे स्टेशन व परत |
| २ | २ | कॅम्प नंबर १ ते शिव मंदीर |
| ३ | ३ | कॅम्प नंबर १ ते शिव मंदीर व्हाया कुर्ला कॅम्प |
| ४ | ४ | शिव मंदीर ते उल्हासनगर रेल्वे स्टेशन व्हाया गाउन बाजार |
| ५ | ५ | शिव मंदीर ते आवातराम चौक व्हाया उल्हासनगर रेल्वे पुल |
| ६ | ६ | कल्याण रेल्वे स्टेशन ते अबरनाथ रेल्वे स्टेशन व्हाया शांतीनगर |
| ७ | ७ | शिव मंदीर ते कल्याण रेल्वे स्टेशन व्हाया चोपडा कोर्ट |
| ८ | ८ | शिव मंदीर ते उल्हासनगर रेल्वे स्टेशन व्हाया नेताजीचौक |
| ९ | ९ | शिव मंदीर व्हाया कलानी,व्ही टी सी ग्राउन्ड, विठठलवाडी, तीस गांव, कल्यान रेल्वे स्टेशन,सत्रा सेक्शन,श्रीराम, गांधी रोड, शिव मंदीर |

| | | |
|---|---|---|
| १० | १० | शिवमंदिर ते शिळफाटा |
| ११ | ११ | कॅम्प नं. १ ते पोडगांव वाया टिटवाळा |
| १२ | १२ | कॅम्प नं. १ ते भिवंडी |
| १३ | १३ | कल्याण स्टेशन ते कुळगांव बदलापुर |
| १४ | १४ | शिवमंदिर ते हाजिमलंग |

**सध्या सुरू असलेले मार्ग**

| अ.क्र. | मार्ग क्रमांक | **सध्या सुरू असलेले मार्ग** |
|---|---|---|
| १ | १ | अंबरनाथ ते कल्याण वाया कॅम्प नं. ५,४,३,२,१ |
| २ | २ | अंबरनाथ ते कल्याण वाया श्रीराम चौक, विठ्ठलवाडी, नेतवली |
| ३ | ३ | ब्दलापुर ते कल्याण वाया शांतीनगर |
| ४ | ४ | अंबरनाथ ते कल्याण वाया खेमाणी, धोबीघाट |
| ५ | ५ | फातिमा शाळेच्या ट्रिप्स |

वरिल एमएमआरटीए समिती ने मंजुर केलेल्या मार्गापैकी उर्वरित खालील मार्गासाठी निविदा काढून नविन ठेकेदार नेमण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.तसेच में.केस्ट्रल इंन्फ्रस्ट्रक्चर प्रा.लि, उल्हासनगर यांनी कळविल्यानुसार सध्या सुरू असलेले मार्ग दुस—या ठेकेदारास दिल्यास त्यांची काही हरकत नाही व ते वारंवार परिवहन सेवा तोटयात असून ते चालविल्यास असमर्थ असल्याचे दर्शविल्यामुळे सर्व मार्गासाठी नविन ठेकेदार नेमण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मार्ग क्रमांक | **नविन ठेकेदार नेमण्यासाठी प्रस्तावित मार्ग** |
|---|---|---|
| १ | १ | कल्याण रेल्वे स्टेशन ते अंबरनाथ रेल्वे स्टेशन व परत |
| २ | २ | कॅम्प नंबर १ ते शिव मंदीर |
| ३ | ३ | कॅम्प नंबर १ ते शिव मंदीर व्हाया कुर्ला कॅम्प |
| ४ | ४ | शिव मंदीर ते उल्हासनगर रेल्वे स्टेशन व्हाया गाउन बाजार |
| ५ | ५ | शिव मंदीर ते आवातराम चौक व्हाया उल्हासनगर रेल्वे पुल |
| ६ | ६ | कल्याण रेल्वे स्टेशन ते अबरनाथ रेल्वे स्टेशन व्हाया शांतीनगर |
| ७ | ७ | शिव मंदीर ते कल्याण रेल्वे स्टेशन व्हाया चोपडा कोर्ट |
| ८ | ८ | शिव मंदीर ते उल्हासनगर रेल्वे स्टेशन व्हाया नेताजीचौक |
| ९ | ९ | शिव मंदीर व्हाया कलानी,व्ही टी सी ग्रउन्ड, विठठलवाडी, तीस गांव, कल्यान रेल्वे स्टेशन,सत्रा सेक्शन,श्रीराम, गांधी रोड, शिव मंदीर |
| १० | १० | शिवमंदिर ते शिळफाटा |
| ११ | ११ | कॅम्प नं. १ ते पोडगांव वाया टिटवाळा |
| १२ | १२ | कॅम्प नं. १ ते भिवंडी |
| १३ | १३ | कल्याण स्टेशन ते कुळगांव बदलापुर |
| १४ | १४ | शिवमंदिर ते हाजिमलंग |

नविन निविदेच्या अटी व व शर्ती जुन्या निविदेप्रमाणे असतील व त्यांचे टिकिट दर सध्या सुरू असलेल्या टिकीट दराप्रमाणे असतील तसेच सर्व मार्गासाठी प्रत्येक मार्गासाठी वेगळी निविदा काढण्यासाठी गोषवारा मा. परिवहन समितीपुढे मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

<u>परिवहन समिती ठराव क्र</u>. ४ <u>दिनांक :— १७/६/२०१३</u>

सूचकाचे नाव :— श्री. परमानंद हिंदुजा

अनुमोदकाचे नाव :— श्री. कुलदिपसिहं मथारु

ही परिवहन समिती प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे उल्हासनगर शहरात बससेवा पुरविणेकामी प्रशासन निश्चित करेल त्या त्या मार्गासाठी सोबत जोडलेल्या अटी, शर्ती व निर्बंधांवर तीन विविध ठेकेदार नेमणे प्रयोजनार्थ नविन निविदा काढण्यास मान्यता देत आहे.

सूचकाची सही /—

अनुमोदकाचे नाव/—

**<u>सर्वानुमते</u>**

सभापती/पीठासीन अधिकारी
परिवहन समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

# निकाल घोषणा

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. निकम कमलेश मधुकर | ३ |
| २. | श्री. भोईर समीर सुर्यकांत | ९ |
| ३. | श्री. मथारु कुलदिपसिंग गुरुदयालसिंग | १ |
| **एकुण मतदान संख्या –** | | **१३** |
| **तटस्थ** | | ० |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम २००७ च्या नियम–६ मधील पोटनियम (७) अन्वये पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारान्वये परिवहन समिती सभापती पदाचे उमेदवार **श्री.भोईर समीर सुर्यकांत** हे **एकूण १३ मतांपैकी ०९** इतकी म्हणजे सर्वाधीक मते मिळवून निवडून आल्याने त्यांची **परिवहन समिती सभापती** पदी रितसर नेमणूक झाली आहे असे मी जाहिर करतो.

दिनांक :–२३/८/२०१३

(डॉ. ए.टी. कुंभार)
अपर आयुक्त, कोकण विभाग, मुंबई
तथा
पीठासीन अधिकारी

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका
सभागृह